०१/०४५/००४५/०४/२०१८ 1879
क्र.साप्रवि/डे-३/विअसां/स्थासभा/ /२०१८.

खास दुताव्दारे
पोष्टाचा दाखला घेवून

कार्यालय- जिल्हा परिषद, गोंदिया
(सामान्य प्रशासन विभाग)
दिनांक:- 13/07/2018

**नमुना - अ -**
**स्थायी समिती सभेची नोटीस**

मा.श्री./श्रीमती------------------------------------------------------------------ जि.प.सदस्य

मु.------------------------------ पो.----------------------------------- ता. ------------------------

जिल्हा गोंदिया यांना याव्दारे कळविण्यात येते की, **जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक २५/०७/२०१८ ला दुपारी १.०० वाजता** जिल्हा परिषदेच्या सभागृहात मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली नमुना -अ- चे जोडपत्रात उल्लेखिलेल्या विषयाचे कामकाज चालविण्याकरिता आयोजित करण्यात आलेली आहे. सदर्हू सभेत आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

सचिव
स्थायी समिती सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि.)
जिल्हा परिषद गोंदिया

**नमुना -अ- चे जोडपत्र**

१) मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करण्याबाबत.
२) तिन वर्षाहून अधिक कालावधीच्या अमानत ठेव रक्कमा काढण्याकरिता मंजुरी प्रदान करणेबाबत.
३) सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात बिगर आदिवासी योजना व आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत प्राप्त निधीनुसार बांधकामावरील खर्चाला मंजुरी प्रदानार्थ जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस शिफारस करणे.
४) सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात पशुसंवर्धन विभाग जि.प.गोंदियाला प्राप्त झालेल्या तरतुदीतुन योजना राबविण्यास प्रशासकिय मंजूरी प्रदान करणे.
५) जिल्हा वार्षिक योजना सन २०१८-१९. बिगर आदिवासी (सर्वसाधारण) योजना व आदिवासी अंतर्गत उपकेंद्राची नविन इमारत बांधकामाला मंजूरी प्रदान करण्याबाबत.
६) जिल्हा वार्षिक योजना सन २०१८-१९ या वर्षात बिगर आदिवासी (सर्वसाधारण) योजना व आदिवासी/ओटीएसपी उपयोजना अंतर्गत आरोग्य संस्थाचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता प्राप्त निधीच्या अनुषंगाने नियोजन करण्याबाबत.
७) जिल्हयातील काही आरोग्य संस्थेच्या मोडकळीस आलेल्या (प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र) इमारती तोडून नविन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत.
८) शासकिय परिपत्रकांचे वाचन करणे.
९) मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.
१०) स्थायी समिती सभेचे ठराव नियम ११९ (१३) नुसार कायम करणे.

सचिव
स्थायी समिती सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि.)
जिल्हा परिषद गोंदिया

**प्रतिलीपी:- माहितीस्तव सविनय सादर.**
मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया.
मा. सभापती, विषय समिती ------------------------------------------ जिल्हा परिषद, गोंदिया.
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.

# जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक ३ जुलै २०१८

## कार्यवृत्त भाग १

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|
| दिनांक ३.७.२०१८<br>वेळ दुपारी १.०० वा. | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक ३.७.२०१८ ला दु. १.०० वा. मा. श्रीमती सिमा मडावी, अध्यक्षा, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सभेला विषय समितीचे सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तथा सचिव स्थायी समिती, जिल्हा परिषद व इतर खात्याचे विभाग प्रमुख, खंड विकास अधिकारी, उपविभागीय अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

**विषय क्रमांक १ :- मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबावत.**

**ठराव क्रमांक १ :-** सभेला सुरवात होताच सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी जि.प. अंतर्गत झालेल्या प्रशासकीय बदलीबाबत विचारणा केली. बांधकाम विभागातील व.स.लेखा संवर्गातील कु. आर.एल. राऊत अपात्र असतांना व त्यांचा मुलगा ६० टक्के अपंग असल्यामूळे त्यांची बदली करु नये याबाबत लेखी स्वरुपात कळविल्यानंतरही त्यांची बदली करण्यात आली. तसेच त्यांचे प्रशासकीय बदलीत क्र.२ वर नांव होते. प्रशासकीय बदलीस पात्र यादीतील क्र.१ वरील नांव वगळून क्र.२ वरील कर्मचाऱ्याची बदली का करण्यात आली. याबाबत विचारणा केली. सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी यास दुजोरा दिला व शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावर उप मुकाअ (सामान्य) यांनी माहिती दिली की, दिनांक १५ मे २०१४ च्या शासन निर्णयातील ५.२ नुसार एखादा कर्मचारी महत्वपूर्ण प्रकल्पावर काम करीत असेल व त्या कर्मचाऱ्याची बदली झाल्यामूळे प्रकल्प राबविण्यात अडचण निर्माण होत असल्यास त्या कर्मचाऱ्यास बदलीपासून सुट देण्यात येते. सदर कर्मचारी हे Bill portal वर काम करीत आहे, त्यामूळे त्यांना सुट देण्यात आली. यावर प्रकल्पाकरीता एखाद्या कर्मचाऱ्यास थांबवता येत असल्यास ज्या कर्मचाऱ्याचा मुलगा अपंग असल्यामूळे व क्र.२ वर असल्यामूळे त्यांचीही बदली थांबवणे अपेक्षीत असल्याचे सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी सांगितले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, याही वर्षी दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. दिनांक ३ जुलै २०१८ पर्यंत पावसाअभावी भातपिकाच्या पेरणीने सरासरी ओलांडलेली नाही. त्यामूळे याही वर्षी शेतकऱ्यांवर संकट निर्माण होऊ शकते. काही शेतकऱ्यांनी नक्षत्र सुरु होण्याअगोदर पेरणी केलेली होती. परंतू मध्यंतरी पाऊस न आल्यामूळे पेरणीचे नुकसान झालेले आहे. पावसाअभावी नर्सरीही बिगडलेली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आलेली आहे. याकरीता काही उपाययोजना आहे काय? तसेच गोंदिया जिल्हयात किती पाऊस झाला याबाबतची माहिती विभागाने सांगावी. यावर कृषी अधिकारी यांनी गोंदिया

जिल्हयात ६६ टक्के पाऊस झाल्याची माहिती दिली व बियाणाची कमतरता नसल्याचे सांगितले. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, जिल्हयात पाऊस कमी झाल्यामूळे शेतकऱ्यांनी सुरवातीला पेरणी केलेले बियाणे खराब झालेली आहेत. शेतकऱ्यांना एकूण २५ किलो बियाणे मिळतात. शेतकऱ्यांकडे ४ एकर शेती असल्यास २५ किलो बियाणे फार कमी आहे. वास्तविक एका एकराला २० किलो बियाणे याप्रमाणे ८० किलो बियाणे मिळणे आवश्यक आहे. त्यामूळे सदर बाब शासनास कळविणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनीही एका एकरास २० किलो बियाणे याप्रमाणे ५ एकरास १०० किलो बियाणे मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले.

सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले केले, बघोडी, ता. तिरोडा येथे सिंचन योजने मध्ये ईनवेल बोर मंजूर करण्यात आले होते. परंतू पावसाळा सुरु झाल्यामूळे ईनवेल बोर पुर्ण होऊ शकले नाही. त्यामूळे ज्या शेतकऱ्यांचे ईनवेल बोर पुर्ण झालेले नाहीत त्यांना माहे मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, MREGS अंतर्गत यानंतर शेताला जोडणारे पांदन रस्ते घेता येणार नाही. गोंदिया जिल्हयात मोठया प्रमाणात पांदन रस्ते घेण्यात आलेले होते. ग्रामविकास सचिव दौऱ्यावर आले असता त्यांनी इथले पांदन रस्ते बधितल्यानंतर संबधित संकेतस्थळ बंद केले आहे. त्यामूळे बरीचशी देयके प्रलंबित आहे. करीता यासंबंधी ठराव करुन शासनाला कळविण्यात यावे. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी ही यास दुजोरा दिला. यावर उप मुकाअ (मनरेगा) यांनी डांबर रस्ता बाजुला असतांना पांदण रस्ता का करण्यात आला. सदर पांदण रस्त्यावर केलेला खर्च व्यर्थ आहे. असा सचिवांचा समज झालेला आहे. त्यामूळे त्यांनी तात्पुरते संकेतस्थळ बंद केले आहे. तरीही ठराव करुन शासनास सादर केल्यास सोयीचे होईल अशी माहीती दिली.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, आमगांव तालुक्यातील मनरेगा अंतर्गत कंत्राटी कर्मचारी जाणीवपूर्वक ३-४ महिने देयके काढत नाही. कधी-कधी १ वर्षापर्यत देयक काढले जात नाही. याकरीता आवक-जावक रजिस्टर ठेवण्याकरीता सांगितले होते. त्याप्रमाणे सभेत निर्देश देऊनही अंमलबजावणी झालेली नाही. करीता आवक-जावक रजिस्टर ठेऊन व प्रत्येक देयकाची रजिस्टर मध्ये नोंद घेऊन अनुक्रमानुसार देयक काढण्यात यावे, जेणेकरुन कुठलेही देयक प्रलंबीत राहणार नाही. तसेच याप्रमाणे संपूर्ण जिल्हयात कार्यवाही करण्याचे मत व्यक्त केले. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी सर्व गट विकास अधिकारी यांनी याबाबत नोंद घेण्याचे निर्देश दिले. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सदर विषय मागील १ वर्षापासून प्रलंबीत असल्याचे अवगत केले. FTO मारणारा कर्मचारीच नाही तर इतर अधिकारी/कर्मचारी सुद्धा या प्रकरणात गुंतले आहेत. त्यामूळे सर्व देयकांची नोंद आवक-जावक मध्ये घेण्याच्या सुचना सर्व गट विकास अधिकारी यांना लिखीत देण्यात यावे अशी मागणी केली.

सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी अवगत केले की, सन २०१४ पासून ग्रामपंचायत जवरी येथील रोजगार सेवकाचा अनियमततेबाबतचा मुद्दा गाजत आहे. रोजगार सेवकाला ठेवावे किंवा नाही याचे अधिकार शासन निर्णयानुसार ग्राम सभेला आहे. ग्रामसभेत ८२ टक्के लोकांनी रोजगार सेवका कडून निर्णय घेतलेला आहे. ग्रामसभेने पुनश्चः ग्रामसेवकाला नियुक्ती ओदशही दिलेले आहे तसेच

अफरातफरीच्या रकमेची वसुलीही करण्यात आलेली आहे. गट विकास अधिकारी यांनी सदर नस्ती बंद करण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे. न्यायालयानेही सदर विषयावर ग्रामसभा घेऊ नये असे आदेश दिलेले आहे. असे असतांनाही उपसरपंचाने ग्रामसभा घेऊन आपल्या मतानुसार कार्यवृत्तात नोंद घेऊन मतदान न घेताच रोजगार सेवकाला काढण्याचा निर्णय घेतलेला आहे. एकदा सभा झाल्यानंतर त्याच विषयावर दुसऱ्यांदा ग्रामसभा घेता येत नाही. झालेली सभा कायदेशीर नाही त्यामूळे रोजगार सेवकावर कार्यवाही करणे योग्य नाही. शासन निर्णयाप्रमाणे दोषी व्यक्तींस सुधारण्याची एक संधी देण्यात येते, त्यामूळे त्यांनाही संधी देण्यात यावी अशी विनंती केली. यावर उप मुकाअ (मनरेगा) यांनी सदर प्रकरणाची चौकशी झाल्याचे व नस्ती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे ठेवण्यात येणार असल्याची माहिती दिली. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सभेचे स्थळ कसे बदलले याबाबत मुद्दा उपस्थित केला. दिनांक ३०.१२.२०१५ च्या ग्रामसभेत संधी देण्यात यावे असा निर्णय झाल्यानंतरही दुसऱ्यांदा त्याच विषयावर ग्रामसभा घेणे हे चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री ऊषा शहारे यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत भरेगांव येथील मंजूर योजनेचे त्वरीत उद्‌घाटन करुन काम सुरु करण्याचे निर्देश मागील सभेत दिले असल्याचे अवगत केले. सदर योजना रु. २४.०० लक्षची असून अजूनही उद्‌घाटन झालेले नाही. सिरपूर योजनेचे उद्‌घाटन दिनांक २३ जूनला करण्यात आले याबाबत माहिती आम्हाला वृत्तपत्रातून होते, ही फार शोकांतीका आहे. तसेच पावसाळयात काम सुरु करण्याचे औचित्य काय? यावर संबंधीत अधिकारी यांनी विभागामार्फत उद्‌घाटन झाले नसल्याची माहिती दिली. सदर योजनेचे रितसर उद्‌घाटन करण्यात येईल. यावर सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी सदर योजनेचे रितसर उद्‌घाटन होत नाही तोपर्यंत बांधकाम थांबविण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनी संबंधीत अधिकारी यांनी परस्पर उद्‌घाटन केल्यामूळे त्यांचेवर कारवाई प्रस्तावीत करुन समोरच्या स्थायी समिती सभेत प्रस्ताव ठेवण्याची मागणी केली. उद्‌घाटन न करताच काम कसे सुरु केले याबाबत सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी विचारणा केली. वृत्तपत्रात उद्‌घाटन झाल्याची बातमी प्रसिद्ध झालेली आहे. त्यामूळे आपण खोटे बोलत आहात हे सिद्ध होते. त्यामूळे आपणाविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये? याबाबत विचारणा केली. प्रोटोकॉल न पाळल्यामूळे संबंधीतावर कारवाई करण्यास सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी मत व्यक्त केले. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी सदस्यांना विश्वासात न घेताच उद्‌घाटन केल्यामूळे नाराजी व्यक्त केली व संबंधीतावर शासन निर्णयानुसार प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश दिले.

सन्मा. सदस्या श्रीमती रजनी गौतम यांनी अवगत केले की, सुकळी येथील श्री नरेंद्र नत्थु शेंडे यांना घरकुल मंजूर झालेले असून घरकुल बांधकामाचा निधी लाभार्थीच्या बँक खात्यात जमा झालेला आहे. परंतू गट विकास अधिकारी यांनी बँकेला पत्र देऊन निधी थांबविण्याचे कळविले आहे. याबाबत खुलासा सादर करण्याची मागणी केली.

मुद्दा क्रमांक १ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री सुरेश हर्षे यांनी निदर्शनास आणून दिले की, टाकरी व करंजी येथील योजनेवर लाखो रुपयांचा खर्च झालेला आहे. एवढा खर्च होऊनही पाणी सुरळीतपणे सुरु झालेले नाही. अनुपालन सादर करतांना अनुपालन अहवालावर उपमुख्य कार्यकारी

यानंतर अनुपालन सादर
अधिकारी (साप्रवि) यांची स्वाक्षरी नसल्यामूळे नाराजी व्यक्त केली.
करतांना अनुपालनावर संबंधीत अधिकारी यांनी स्वाक्षरी करण्याची मागणी केली.

मुद्दा क्रमांक ४ वर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, अनुपालनात दिनांक ०९.०६.२०१८ ला मा. मुकाअ यांचेकडे नस्ती सादर केल्याचे नमुद आहे. परंतु नस्ती सादर केल्यानंतर पुढे काय झाले याबाबत काहीही उल्लेख नाही. अफरातफर केलेल्या एकाही कर्मचारीकडून वसुली करण्यात आलेली नसल्याचे मत व्यक्त केले. १ महिन्याच्या आत कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे सभेला आश्वासीत केले होते. परंतू कार्यवाही अजूनही झालेली नाही. उप मुकाअ (पंचायत) यांनी माहिती दिली की, सोनी येथिल ग्रामसेवकाला निलंबीत केलेले असून सरपंचाला शेवटची संधी दिलेली आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०९.०६.२०१८ ला ठेवलेली सुनावणी काही कारणामूळे झालेली नाही. लवकरच सुनावणी घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे असश्वासीत केले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी ग्रा.पं. झांजीया येथील ग्रामसेवक श्री नैकाने यांनी निलंबीत झाल्यानंतरही सरपंचाची खोटी स्वाक्षरी करुन निधीची उचल केलेली असल्याचे अवगत केले. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अफरातफर केलेल्या सरपंचाची प्रॉपर्टी शासन निर्णयाप्रमाणे ताब्यात घेण्याची कार्यवाही करता येते असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी ग्रामपंचायत सोनी व, ग्रा.पं. झांजीया प्रकरणात श्री नैकाने, ग्रामसवक यांचेवर पुढील सभेपर्यंत कार्यवाही करावी अशी मागणी केली.

सन्मा. सदस्या श्रीमती उषा शहारे यांनी अवगत केले की, देवरी येथील जिल्हा परिषद शाळेत ५ वा वर्ग सुरु झालेला आहे. परंतू वर्गातील डेस्क-बेन्च तुटलेले असल्यामूळे शाळेतील मुख्याध्यापक यांनी शाळा सुरळीत सुरु राहण्याकरीता लोकवर्गणी मागीतलेली आहे. त्यामूळे शाळेतील देखभाल दुरुस्तीकरीता निधी देण्याची मागणी केली. तसेच यासंबंधी तेथील गट शिक्षणाधिकारी यांनी लक्ष दिले नाही, त्यामूळे त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी केली. यावर शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी शाळेतील शिक्षकांनी लोकवर्गणी मागावी याप्रकारचा आग्रह शिक्षण विभाग करीत नाही. परंतू गावांतील जनतेने स्वतःहून वर्गणी दिल्यास याबाबतचे स्वागत नेहमीच करण्यात येते. तसेच तेथील गटशिक्षणाधिकारी यांनी आजच याबाबत माहिती दिलेली आहे अशी माहीती दिली. तसेच शिक्षकांनी स्वतःहून लोकवर्गणी मागू नये याबाबत शिक्षकांना सुचीत करण्यात येईल असे सांगितले.

सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी विषय समितीचे कार्यवृत्त स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्यांना देण्यात यावे याबाबत वारंवार सुचना देऊनही कार्यवृत्त न दिल्यामूळे नाराजी व्यक्त केली. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मागील ६ महिन्यांचे सर्व विषय समितीचे कार्यवृत्त जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले असल्याची माहिती दिली. प्रत्येक सन्मा. सदस्यांकडे इंटरनेटची सुविधा असेल असे नाही व मोबाईल मधून प्रिंट आऊट काढणे शक्य नसल्याचे सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी सांगितले. त्यामूळे सन्मा. सदस्यांना छायांकीत प्रत पुरविण्याची मागणी केली. विषय समितीचे कार्यवृत्ताची छायांकीत प्रत देण्याची मागणी रेटून धरली. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी संबंधीत विषय समितीचे सभापती याबाबत निर्णय घेतील असे सांगितले. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सभापती श्री रमेश अंबुले यांनी अवगत केले की, सर्व विषय समित्यांचे

कार्यवृत्त जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यामूळे आवश्यक ती माहिती काढून घेता येऊ शकते व ते प्रशासनाचे दृष्टीनेही सोयीचे होईल. सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनीही विषय समितीचे कार्यवृत्त संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे सांगितले. तसेच सर्व सन्मा. सदस्यांकडे इंटरनेटची सुविधा असल्यामूळे कोणीही कार्यवृत्त बघु शकते मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी भंडारा जिल्हयाने मच्छिमार यांनी लीज वर घेतलेल्या मत्स्यपालन तलावाची मागील वर्षीची लीज माफ केलेली असल्याचे सभागृहास अवगत केले. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्हा परिषदेने तलावाची लीज माफ करण्याचा ठराव करावा. सर्वसाधारण सभेत लीज माफ करण्याबाबत फक्त चर्चा झालेली आहे. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी भंडारा जिल्हयाने दुष्काळी परिस्थीत पाहून रु. २३.०० लक्ष माफ केलेले आहे. त्याचप्रमाणे यासंबंधीचा आढावा घेऊन एकुण किती रक्कम माफ करावी लागेल व याचा जिल्हा परिषदेच्या उत्पन्नावर काय परिणाम होईल, या आर्थिक बाबीचा विचार करुन लीज माफ करण्याचा निर्णय घेण्यात यावा असे मत व्यक्त केले. यावर उम मुकाअ (पं) यांनी माहिती दिली की, गोंदिया जिल्हयात एकुण १२०० तलाव आहेत. एका वर्षाला जवळपास रु. ३५.०० लक्ष लीज जमा होते. सर्वांची सहमती असल्यास मागील वर्षीची लीज माफ करता येऊ शकते. यावर सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी तालुकानिहाय सविस्तर माहिती घेऊन पुढील सभेत विषय ठेवण्याकरीता सुचविले.

**<u>विषय क्रमांक २</u> :- ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील विजेचे खांब व दिव्यांच्या संख्येत वाढ करण्याचे प्रस्तावास मंजूरी प्रदान करणेबाबद.**

**<u>ठराव क्रमांक २</u> :-** सदर विषयावर चर्चा करतांना मागील ३ वर्षात किती प्रस्तावाला मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे व त्यापैकी किती प्रस्तावावर अंमलबजावणी केलेली आहे, याबाबतची माहिती पुढील सभेत ठेवण्याची मागणी सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी केली. सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर विषयास मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्रमांक ३</u> :- शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सिंचन पाईप खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करणे.**

**<u>ठराव क्रमांक ३</u> :-** सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी अवगत केले की, DBT नुसार साहित्य वाटप करणे हा सरकारचा चांगला हेतू आहे. परंतू DBT ची अंमलबजावणी बरोबर होत नसल्यामूळे लाभार्थी यांना त्रास सहन करावा लागतो. महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत DBT मार्फत पुरविण्यात येत असलेल्या शिलाई मशीनची रक्कम लाभार्थीनी भरल्यानंतरही साहित्य लाभार्थिना प्राप्त झालेले नसल्याचे अवगत केले.सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर विषयास मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्रमांक ४</u> :- शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करणे.**

**<u>ठराव क्रमांक ४</u> :-** सदर विषयावर चर्चा करतांना DBT मुळे सदर योजनेला प्रतिसाद कमी मिळाल्यामूळे मागील वर्षीची शिल्लक रक्कम रु. १३.०० लक्ष असल्याचे सभागृहाचे निदर्शनास

आल्यानंतर सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी ताडपत्री ऐवजी औषधीवर खर्च करण्याचे मत व्यक्त केले. सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनीही सदर खर्च औषधीवर वळती करण्याचे सुचविले. यावर कृषी विकास अधिकारी यांनी माहिती दिली की, एकाच वर्षाची मुदत वाढ असल्यामूळे खर्च करता येणार नाही. मुदत वाढीकरीता पुढील सभेत विषय ठेवण्याकरीता सन्मा. सदस्य गंगाधर परशुरामकर, राजलक्ष्मी तुरकर यांनी मागणी केली यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी रु. १३.०० लक्षचे मुदतवाढीकरीता पुढील सभेत विषय ठेवण्याकरीता निर्देश दिले.

**विषय क्रमांक ५ :- पिक संरक्षण उपाययोजना व औषध खरेदीस मंजुरी प्रदान करणे.**

**ठराव क्रमांक ५ :-** सदर विषयावर साधक-बाधक चर्चा करुन पिक संरक्षण उपाययोजना व औषध खरेदीस मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ६ :- शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.**

**ठराव क्रमांक ६ :-** नविन शासन परिपत्रकाचे सन्मा. सदस्य यांना छायांकीत प्रती देण्यात आल्या.

सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी दिनांक २ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे ज्या संघटनांना शासन मान्यता नाही, अशा संघटनांची निवेदने स्विकारु नये असा शासन निर्णय असल्याचे अवगत केले. शिक्षक संघटना फार जास्त असून त्यांची निवेदनही जास्त प्रमाणात प्राप्त होतात. वरिल शासन निर्णयामूळे शिक्षण विभाग काय कार्यवाही करेल. याबाबत विचारणा केली. यावर शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी माहिती दिली की, शासन स्तरावर शिक्षकांच्या एकाही संघटनेस शासन मान्यता नाही. फक्त त्यांचे समाधान व्हावे याकरीता निवेदन स्विकारल्या जातात. त्यांना फारसा वेळ दिला जात नाही.

**विषय क्रमांक ७ :- मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

**विषय क्रमांक ७/१:- श्री अशोक पाटील, गट विकास अधिकारी, पं.स. आमगांव यांची दिनांक ५.६.२०१७ ते ३१.१०.२०१७ पर्यंत १४९ दिवसांची अर्जित रजा व दिनांक १.११.२०१७ ते १८.३.२०१८ पर्यंत १३८ दिवसांची परावर्तीत रजा वैद्यकीय कारणास्तव मंजूर करण्याबाबत.**

**ठराव क्रमांक ७/१ :-** सदर विषयावर चर्चा करुन श्री अशोक पाटील, गट विकास अधिकारी, पं.स. आमगांव यांची दिनांक ५.६.२०१७ ते ३१.१०.२०१७ पर्यंत १४९ दिवसांची अर्जित रजा व दिनांक १.११.२०१७ ते १८.३.२०१८ पर्यंत १३८ दिवसांची परावर्तीत रजा वैद्यकीय कारणास्तव सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ७/२:- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जिल्हा अंतर्गत प्राप्त अंदाजपत्रकीय तरतुदीच्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याबाबत. (जिल्हा वार्षिक योजना व इतर)**

**ठराव क्रमांक ७/२:-** सदर विषयावर चर्चा करुन विषय सर्वानुमते सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जिल्हा अंतर्गत प्राप्त अंदाजपत्रकीय तरतुदीच्या खर्चास मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्रमांक ७/३</u> :- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात २०% शेष फंड व ३% दिव्यांग कल्याण सेस फंड जिल्हानिधी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांचे अखर्चित निधी सन २०१८-१९ मध्ये खर्च करण्याची मंजूरी मिळणे बाबत.**

**<u>ठराव क्रमांक ७/३</u>** :- सदर विषयावर चर्चा चर्चा करतांना सन्मा. सदस्या श्रीमती उषा शहारे यांनी वैयक्तीक लाभ लाभार्थीपर्यंत पोहचत नसल्याचे अवगत केले. तसेच लाभार्थी यादी किती दिवसांत पुरविण्यात येईल. याबाबत विचारणा केली व आदिवासी क्षेत्र बिष्णोरा गावातील २ ते ४ वर्ष वयोगटातील मुले अंगणवाडीत जातात. परंतू सदर अंगणवाडी ही किरायाचे घरात आहे. करीता ग्रा.पं. मैसुली अंतर्गत बिष्णोरा येथे अंगणवाडीची मागणी केली. चर्चेत सहभाग घेतांना सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी लाभार्थीना या वर्षीचा लाभ पुढील वर्षात मिळत असल्यामूळे नाराजी व्यक्त केली. यावर सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनी पंचायत समिती कडून यादी वेळेवर प्राप्त न झाल्यामूळे उशीर झाला असल्याचे अवगत केले. सन्मा. सभापती श्रीमती लता दोनोडे यांनी लाभार्थी यादी सर्व पंचायत समिती मध्ये वितरीत करण्यात आल्याचे सांगितले. परंतू अजूनही लाभार्थीच्या खात्यात निधी जमा झालेला नाही. यास गट विकास अधिकारी जबाबदार असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी पं.स. तिरोडा येथे अति. गट विकास अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारीचे पद रिक्त असल्याचे अवगत करुन शक्य तितक्या लवकर बालविकास प्रकल्प अधिकारी देण्याची मागणी केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**<u>विषय क्रमांक ७/४</u>:- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायकाची सेवा बाहय यंत्रणेद्वारे (Outsourcing) घेणेबाबत.**

<u>ठराव क्रमांक ७/४</u> :- सदर विषयावर चर्चा करतांना सन्मा. सभापती श्री विश्वजीत डोंगरे यांनी अवगत केले की, ग्राम विकास विभागाचे शा.नि. दि. १५ मार्च २०१८ नुसार माहिती तंत्रज्ञान कार्यालय सहायकांचे वेतन जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून करायचा आहे. सदर कर्मचारी यांची नियुक्ती केल्यास त्यांचे वेतनावर वर्षाला रु. ७० ते ८० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

सदर विषयावर साधक-बाधक चर्चा करुन सदर पदे भरल्यास वर्षाला किती खर्च येईल व यामूळे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नावर काय परिणाम होईल याबाबतची सविस्तर माहितीसह पुढील स्थायी समिती सभेत विषय ठेवण्याकरीता सर्वानुमते ठरले.

**<u>ऐनवेळी सभेत करण्यात आलेली चर्चा.</u>**

१) उपमुकाअ (सामान्य) यांनी सभेत सांगितले की जिल्हा परिषद गोंदिया येथे विविध प्रकरणे हाताळण्याकरिता नविन अधिवक्ता पॅनलची नियुक्ती करण्यात आली असून उच्च न्यायालय व स्थानिक न्यायालयाकरिता प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने १४.०२.२०१८ ला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली उपस्थित उमेदवारांकडून दस्ताऐवजाची तपासणी करुन दिनांक २१.०४.२०१८ ला मा.अध्यक्ष जि.प.गोंदिया यांच्या कक्षामध्ये मा.अध्यक्ष तथा निवड समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीद्वारा उपस्थित उमेदवारांचे प्रत्यक्ष मुलाखात घेण्यात आली. निवड समितीने दिलेल्या गुणदानाच्या आधारे प्राविण्य प्रमाणे उच्च न्यायालयाकरिता अॅड. कापगते, अॅड. परिहार, अॅड. अनंत दिक्षीत व अॅड. मेघना मुंशी असे एकुण ४ अधिवक्तांची निवड करण्यात आली आहे. तसेच स्थानीक न्यायालयाकरिता अॅड.

श्रीमती सुचना मेश्राम, अॅड. सी.के.व्दिवेदी, अॅड सी.के.वढे, अॅड.ए.एन.मिश्रा, अॅड. निलु मांढरे व अॅड.के.आर.खंडेलवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे व निवड केलेल्या उमेदवारास आदेश देण्यात आले याबाबद सविस्तर माहिती सादर करण्यात आली. सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी विचारणा करुन शासन निर्णयानुसार पॅनलवरील वकीलांची निवडीचे अधिकार सर्वसाधारण सभेला असतांना मा. अध्यक्षांना अधिकार का देण्यात आले? याबाबतही विचारणा केली. यावर उप मुकाअ सामान्य यांनी माहिती दिली की स्थायी समिती सभेत मा.अध्यक्ष जि.प. यांना पॅनलवर वकीलाची नियुक्ती करण्याचे अधिकार देण्यात आलेले होते. महिला व बालकल्याण विभागाने जातपडताळणी कोर्ट प्रकरण करीता घोंगे यांच्या प्रकरणात रु. १.०० लक्ष फी देण्यात आलेली आहे. सन्मा. सदस्यांनी सदर प्रकरण कोर्टात गेलेले नसल्याची बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली. वकीलाला आधीच फी देण्याची तरतूद नसतांनाही फी देण्यात आलेली आहे. लघु पाटबंधारे विभागातील कोर्ट प्रकरण अॅड. कापगते यांचेकडे असतांना अॅड. परिहार यांचेकडे कशी गेली? याबाबतही विचारणा केली उपरोक्त प्रमाणे चर्चा करण्यात आली.यावर सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी असे कुठलेही अधिकार स्थायी समिती सभेत दिले नसल्याचे अवगत केले. तसेच अॅड. मेघना मुंशी यांना जि.प. गोंदियाच्या पॅनलवरुन काढण्यात आले होते. तसेच त्यांचेबाबत जि.प. गोंदियाचा फार वाईट अनुभव असतांनाही त्यांना पॅनलवर घेतलेले आहे. त्यांचेकडे देण्यात आलेले एकही कोर्ट प्रकरण जि.प.च्या बाजुने लागलेली नाही. उपरोक्त प्रमाणे चर्चा करण्यात आली.

२) सन्मा. सदस्य श्री पी.जी. कटरे यांनी अवगत केले की, ज्या ठिकाणी अंगणवाडीची अत्यंत आवश्यकता आहे, अंगणवाडी जिर्ण झालेली आहे, अशा ठिकाणी अंगणवाडी बांधकाम मंजूर न करता ज्या ठिकाणी अंगणवाडीची आवश्यकता नाही, त्या ठिकाणी अंगणवाडी बांधकाम मंजूर करण्यात येत आहे. देऊटोला येथील अंगणवाडी इमारत चांगल्या स्थितीत असतांनाही तेथे नविन अंगणवाडी मंजूर करण्यात आलेली आहे व विद्यार्थी संख्याही फक्त ८ आहे. त्यामूळे देऊटोला येथील अंगणवाडी बांधकामाची प्रशासकीय मंजूरी रद्द करुन हिरडामाली येथील जिर्ण झालेल्या अंगणवाडी इमारीतीकरीता मंजूरी प्रदान करण्याचे सुचविले. यावर मा. अध्यक्ष महोदया यांनी प्रत्यक्ष चौकशी करुन निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले. सन्मा. सदस्या श्रीमती ऊषा शहारे यांनी नविन अंगणवाडी बांधकाम देऊटोला ऐवजी मैसुली येथे मंजूर करण्याचे सुचविले.

३) सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी कान्होली ग्रा.पं. जमाकुडो येथील अंगणवाडी शाळेच्या खोलीत भरीत असल्याचे अवगत करुन नविन अंगणवाडी बांधकाम मंजूर करण्याची मागणी केली.

४) सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी पं.स. अ/मोरगांव येथे गट क व गट ड अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या बदली कर्मचारी यांची यादी मोघम असल्याचे मत व्यक्त केले. श्री वलथरे, परिचर यांना बदलीकरीता अर्ज केलेला होता. पहिल्या यादीत नांव आलेले असतांना दुसऱ्या यादीत नांव आलेले नाही. तसेच काही कर्मचारी यांची कार्यशाळेत बदली करण्यात आली व नंतर झालेली बदली रद्द करण्यात आली. काही ठिकाणी पद रिक्त नसतांनाही बदली करण्यात आलेली आहे. सदर झालेल्या बदली प्रक्रीयेस स्थगीती देण्यात यावी. तसेच चौकशी समिती गठीत करुन वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी केली. ज्या कर्मचाऱ्यांची तक्रार आहे

सिमा हाडगे या आंतरजिल्हा बदलीने गोंदियात आले असता त्यांना परस्पर अरततोंडी/दाभना येथे म्हणून बदली करण्यात आली, त्यांचे कागदपत्र सादर करण्याची मागणी केली. तसेच श्रीमती पदस्थापना देण्यात आली. मा. अध्यक्ष महोदया यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन चुकीच्या पद्धतीने बदली प्रक्रीया झाली असल्यास नियमानुसार संबंधीतावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधीत कर्मचारी यांची जर चुकीच्या पद्धतीने बदली झाली असल्यास त्यांची सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढण्यात येईल. गट विकास अधिकारी, अ/मोरगांव यांनी माहिती दिली की, सन्मा. सदस्या यांचेकडे जी यादी आहे ती समुपदेशना करीता बोलाविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची आहे. गट विकास अधिकारी यांनी बदली प्रक्रीये बाबत सविस्तर माहिती दिली. ज्या कर्मचाऱ्यांना वयाची ५३ वर्ष पूर्ण झालेली होती, त्या कर्मचाऱ्यांना बदली प्रकीयेमधून वगळण्यात आले. तसेच श्री वाघमारे यांचेबाबत बऱ्याच तक्रारी आहेत, त्यांची चौकशीही होणे आवश्यक आहे. यावर सन्मा. सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी श्री वाघमारे यांचेबाबत तक्रारी असल्यास त्यांचेवर आजपर्यंत काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. कर्मचाऱ्यांची चौकशी न करताच दोषी ठरवणे कितपत योग्य आहे. संपूर्ण बदली प्रक्रीया चुकीच्या पद्धतीने राबविण्यात आलेली आहे. यावर मा. अध्यक्ष महोदयांनी ज्या कर्मचाऱ्यांना आक्षेप असेल त्यांची सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

५) धाबेपवनीवरुन १२ कि.मी. दुर असलेले तिडका येथील अंगणवाडी येथील खिचडीमध्ये फिनाईल आढळले. सदर बाब ही अतिशय गंभीर आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यावर सन्मा. सभापती श्रीमती लता दोनोडे यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येईल असे सांगितले.

६) गोरेगांव येथिल सिंचन विहीरीचा लाभ घेतलेल्या लाभार्थीचा माहे डिसेंबर २०१७ मध्ये मृत्यू पावलेल्या लाभार्थीच्या नावांने धनादेश काढला असल्याचे सन्मा. सदस्य श्री गंगाधर परशुरामकर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. गट विकास अधिकारी यांना याबाबत तक्रार केलेली आहे. यावर उप अभियंता यांनी माहिती दिली की, लाभार्थी मृत्यू पावलेला आहे याबाबत माहिती नसल्यामूळे त्यांचे नावाने धनादेश बनविण्यात आला होता. लाभार्थी यांचे वारसदाराला मृत्यू प्रमाणपत्र व वारसाण प्रमाणपत्र मागितलेले आहे. ते प्राप्त होताच वारसदाराचे नावाने नविन धनादेश बनविण्यात येईल.

**<u>विषय क्रमांक ४</u>:- स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.**

**<u>ठराव क्रमांक ४</u>**:- स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.

(स्वाक्षरी)
**सचिव**
स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गोंदिया

Smadavi
**सभापती**
स्थायी समिती तथा अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया